# ठाणेनगर व राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९५४ /२०२५ दि. ०२/०८/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, ठाणेनगर व राबोडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे प्रस्तुत ऍथलिट्स या संस्थेच्यावतीनं पहिल्यांदाच यंग इंडिया मिनिथॉन २०२५ मॅरेथॉन स्पर्धा दिनांक ०३/०८/२०२५ रोजी सकाळी ०६:३० रोजी आयोजन करण्यात आलेले आहे. सदर मिनी मॅरेथॉन स्पर्धा ४ श्रेणी मध्ये होणार आहे. यात ७,५,३,१ कि. मी. अशा स्पर्धा होणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद –** **१)** घोडबंदरकडून गोल्डन डाईज नाका, कॅसल मील मार्गे नवी मुंबई, ठाणे स्टेशन, खोपटकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **गोल्डन डाईज नाका** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने हि गोल्डन नाका येथुन डावीकडे वळण घेवून मुंबई–नाशिक महामार्गावरून पुढे सरळ जावून साकेत कट येथून उतरुन महालक्ष्मी सर्कल वरुन इच्छित स्थळी जातील.

**ब)** तसेच कॅडबरी – खोपट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **२)** मुंब्रा, कळवा, नवी मुंबई कडून उर्जिता हॉटेल समोरून कोर्टनाका मार्गे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **उर्जिता हॉटेल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने हि उर्जिता हॉटेल येथून उजवीकडे वळन घेवून जेल रोडमार्गे जी.पी.ओ येथून पुढे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्कींग –** **आय.बी. लोखंडवाला ते टेंभीनाका व उर्जिता हॉटेल ते कोर्टनाका या परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.**

**सदर अधिसूचना दिनांक ०३/०८/२०२५ रोजी सकाळी ०५:०० ते सकाळी ११:३० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ ठाणे वाहतूक विभाग व पो.नि. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर